# F.Y.B.A. (Economics)

# Indian Economy (G1)

# भारतीय अर्थव्यवस्था

# प्रकरण पहिले : प्रस्तावना

## १.१ विकसित आणि अल्पविकसित अर्थव्यवस्था : अर्थ आणि संकलल्पना

### विकसित अर्थव्यवस्था :

" ज्या देशामध्ये उपलब्ध साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर केला जातो. त्याद्वारे अधिक आर्थिक विकासाचा वेग साध्य केला जातो, त्या देशांना विकसित देश म्हणतात.'✕

उदा. अमेरिका, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, नॉर्वे, ऑस्ट्रेलिया इ. विकसित देशात शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र, सेवा क्षेत्र, विकसित झालेली असतात. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न अधिक राहून ते दरवर्षी सातत्याने वाढत राहते. जागतिक बँकेच्या २००६ च्या विकास अहवालावरून विकसित देशांची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल.

'ज्या देशांचे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हे १००६६ डॉलर किंवा त्यापेक्षा जास्त आहे. अशा उच्च गटातील देश म्हणजे विकसित देश होय.'

### अल्पविकसित अर्थव्यवस्था :

'ज्या देशामध्ये आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू झाली आहे, परंतु त्यांनी साध्य केलीली विकासाची पातळी खूपच अल्प असते अशा देशांना अल्पविकसित देश म्हणतात. '

भारताचे राष्ट्रीय नियोजन मंडळ - ' ज्या देशात एकाच वेळी उपयोगात न आणलेली नेसर्गिक साधनसंपदा आणि अपूर्ण वापर केलेली मानवी श्रमशक्ती आढळते तो देश अल्पविकसित देश होय.'

संयुक्त राष्ट्र संघ : 'ज्या देशांचे दरडोई वास्तव उत्पन्न अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, व पश्चिम युरोपीय देशांच्या दरडोई वास्तव उत्पन्नाच्या एकचतुर्थांशपेक्षा कमी असेल ते देश अल्पविकसित देश होय.'

## १.२ भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्टये :

१. अल्प दरडोई उत्पन्न
२. प्राथमिक क्षेत्राचे प्राबल्य
३. लोकसंख्येचे वाढते दडपण
४. बेकारीचे मोठे प्रमाण
५.राहणीमानाची निकृष्ठ पातळी
६.व्यापक आर्थिक विषमता
७.भांडवलाची कमतरता
८.मानवी भांडवलाचा निकृष्ट दर्जा
९.तत्रज्ञान विषयक मागासलेपणा
१०.नैसर्गिक साधनसामुग्रीचा अपुरा वापर
११.दारिद्र्याचे प्रमाण
१२.निकृष्ट आर्थिक संगठन

## 1.3 भारातीय अर्थव्यवस्थेची विकसित देशांबरोबर तुलना

### a) लोकसंख्या

| देश | लोकसंख्या (दशलक्ष) २००६ | सरासरी वार्षिक वृध्दीदर (२०००-२००६) | घनता २००६ |
|---|---|---|---|
| ऑस्ट्रेलिआ | २१ | १.२ | ३ |
| कॅनडा | ३३ | ०.९ | ४ |
| स्वित्झर्लंड | ७ | ०.६ | १८६ |
| फ्रांन्स | ६१ | ०.६ | १११ |
| जपान | १२८ | ०.१ | ३५० |
| युनायटेड स्टेट | २९९ | १.० | ३३ |
| भारत | १११० | १.५ | ३७३ |

**b)** दरडोई उत्पन्न

| देश | दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (डॉलर) |
|---|---|
| ऑस्ट्रेलिआ | ३५९९० |
| कॅनडा | ३६१७० |
| स्वित्झर्लंड | ५७२३० |
| फ्रांन्स | ३६५५० |
| जपान | ३८४१० |
| युनायटेड स्टेट | ४४९७० |
| भारत | ८२० |

World development report-2008

# c) मानवी विकास निर्देशांक

| देश | मानवी विकास निर्देशांक | क्रमांक |
|---|---|---|
| Norway | 0.943 | १ |
| Australia | 0.929 | २ |
| United States | 0.910 | ४ |
| Canada | 0.908 | ६ |
| Germany | 0.905 | ९ |
| Switzerland | 0.903 | ११ |
| India | 0.547 | १३४ |

**Human Development Report Nov-2011**

## d) कृषी

| देश | शेतीतील रोजगाराचे प्रमाण (२००२-०४) | स्थूल देशांतर्गत उत्पादनातील शेकडा प्रमाण (२००३-०५) |
|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया | ४०.५ | ३.४ |
| कॅनडा | २.७ | २.२ |
| स्वित्झर्लंड | ४.१ | १.३ |
| जपान | ४.६ | १.७ |
| फ्रान्स | ४.२ | २.४ |
| युनायटेड स्टेट | १.९ | १.३ |
| स्पेन | ५.७ | ३.५ |
| भारत | ६७.० | १९.३ |

e) उद्योग

| देश | स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी शेकडा प्रमाण (मूल्यवृध्दी) २००६ |
|---|---|
| ऑस्ट्रेलिया | २७ |
| जपान | ३० |
| फ्रान्स | २१ |
| युनायटेड स्टेट | २२ |
| स्पेन | २९ |
| डेन्मार्क | २५ |
| भारत | २८ |


World Development Report 2008

# f) सेवा क्षेत्र

| देश | स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी शेकडा प्रमाण (मूल्यवृध्दी) २००६ |
| --- | --- |
| ऑस्ट्रेलिया | ७० |
| जपान | ६८ |
| फ्रान्स | ७७ |
| युनायटेड स्टेट | ७७ |
| स्पेन | ६७ |
| डेन्मार्क | ७४ |
| भारत | ५५ |

World Development Report 2008

# भारताचे राष्ट्रीय उत्पन्न



# २.१ राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना

## स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product )

स्थूल राष्ट्रीय उत्पादन म्हणजे देशातील व्यक्तींनी एका वर्षाच्या कालखंडात जेवढया अंतिम वस्तू आणि सेवांचे उत्पादन केलेले असते त्याची पैशात व्यक्त केलेली किंमत होय.

GNP= GNP + (X-M)

X= निर्यात मुल्य

M= आयात मुल्य

## निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (Net National Production)

स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा वजा केल्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहते त्यास निव्वळ राष्ट्रीय उत्पादन असे म्हणतात.

NNP = GNP - घसारा खर्च

## स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product)

एका वर्षाच्या काळात भौगोलिक सीमारेषेत देशातील लोकांनी आणि परकिय लोकांनी तयार केलेल्या उत्पादनास स्थूल देशांतर्गत उत्पादन असे म्हणतात.

GDP=NNP+घसारा खर्च

## दरडोई उत्पन्न (Per Capita Income)

देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नास एकूण लोकसंख्येने भागले असता देशाचे दरडोई उत्पन्न समजते.

$$PCI = \frac{\text{एकूण राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{लोकसंख्या}}$$

# २.२.१. स्थूल व निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (घटक खर्चानुसार)

कोटी रुपये

| वर्ष | स्थूल राष्ट्रीय उत्पन्न | | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | चालू किमतीला | स्थिर किमतीला (१९९३-९४ च्या किमतीला) | चालू किमतीला | स्थिर किंमतीला (१९९३-९४ च्या किंमतीला) | चालू किंमतीला वृध्दीदर | स्थिर किंमतीलर वृध्दीदर |
| १९९०-९१ | ५०३४०९ | ६८३६७० | ४५०१४५ | ६१४२०६ | १६.७ | ५.४ |
| | | | | | | |
| १९९५-९६ | १०५९७८७ | ८८६९६१ | ९४१८६१ | ७८७८०९ | १६.९ | ७.३ |
| | | | | | | |
| १९९९-०० | १७४६४०७ | ११३७१८५ | १५६४०४८ | १००८११४ | १०.५ | ६.३ |
| १९९९-२००० च्या किंमतीला | | | | | | |
| २०००-०१ | १९०२६८२ | १८४२२२८ | १६९६३८७ | १६४३९९८ | ७.० | ३.७ |
| २००५-०६ | ३२२५९६३ | २५८०७६१ | २८४६७६२ | २२९५२४३ | १३.८ | ९.१ |

## २.२.२.दरडोई उत्पन्नाच्या बाबतीतील १९९१ पासूनची प्रवृत्ती :

| वर्ष | दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न | | दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न | |
|---|---|---|---|---|
| | चालू किमतीला (रुपये) | वृध्दीदर (शेकडा प्रमाण) | स्थिर किंमतीला (१९९३-९४ च्या किंमतीला) | वृध्दीदर (शेकडा प्रमाण) |
| १९९०-९१ | ५३६५ | १४.३ | ७३२१ | ३.३ |
| | | | | |
| १९९५-९६ | १०१४९ | १४.६ | ८४८९ | ५.२ |
| | | | | |
| १९९९-०० | १५६२५ | ८.५ | १००७१ | ४.४ |
| | | | | |
| १९९९-२००० च्या किंमतीला | | | | |
| | | | | |
| २०००-०१ | १६६४८ | ५.१ | १६१३३ | १.९ |
| २००५-०६ | २५७१६ | १२.१ | २०७३४ | ७.४ |

# २.३ राष्ट्रीय उत्पन्न गणनेतील अडचणी

| संकल्पनात्मक अडचणी | व्यावहारिक अडचणी |
| --- | --- |
| १. सेवांच्या समावेशाची अडचण | १. दुहेरी गणनेची समस्या |
| २. बेकायदेशीर व्यवहार | २. वस्तुविनिमय व्यवहाराचे अस्तित्व |
| ३. हस्तांतरीत उत्पन्न | ३. व्यवसायानुसार उत्पन्न गणनेत अडचण |
| ४.सरकारच्या सेवा | ४.असंघटित क्षेत्राचे अस्तित्व |
| | ५. हिशेब ठेवणा-यांचे अल्प प्रमाण |
| | ६. आकडेवारीच्या उपलब्धतेची अडचण |


प्रकरण तिसरे
भारतातील शेती

# ३.१ भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे स्थान

१. राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा

२. मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती

३. औद्योगिकीकरणास मदत

४. सेवा क्षे ंच्या विकासास सहाय्य

५. आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्व

६. आर्थिक नियोजनाच्या दृष्टीकोनातून महत्व

७. सार्वजनिक आयव्ययात महत्वाचे स्थान

८. वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा

९. आर्थिक विकासास मदत

१०. ग्रामीण लोकांच्या राहणीमानात सुधारणा

११. शहरी भागातील समस्यांची सोडवणूक





# हरितक्रांती: यश आणि अपयश

शेती करण्याच्या जुन्या व परंपरागत पध्दती यांचा त्याग करुन त्याऐवजी नविन पध्दतीचा अवलंब करणे व त्याद्वारे शेती उत्पादनाची पातळी वाढविणे म्हणजेच हरितक्रांती होय

# हरितक्रांतीचे यश



- अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ
- नगदी पिकांच्या उत्पादनात वाढ
- पीक रचनेत महत्वपुर्ण बदल
- रोजगारात वाढ
- औद्योगिक विकासाला हातभार
- शेतीकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल
- आर्थिक विकासाला चालना
- शेतक-यांच्या आत्मविश्वासात वाढ
- शेती क्षेत्रातील गुंतवणूकीत वाढ
- आपत्ती काळात स्थैर्य

# हरितक्रांतीचे अपयश



- ठराविक पिकांबाबत यशस्वी
- प्रादेशिक विषमतेत वाढ
- शेतमजूरांना लाभ नाही
- आर्थिक विषमतेत वाढ
- संस्थात्मक सुधारणांकडे दुर्लक्ष
- धनिक शेतक-यांना लाभ

## ३.३ आकराव्या योजनेतील नवीन कृषी व्यूहरचना :

१. जलव्यवस्थापन व जलसिंचन

२. लागवडीखालील जमिनीत वाढ आणि जमिनीच्या गुणवत्तेत सुधारणा

३. ज्ञानाच्या बाबतीतील पोकळी भरुन काढणे

४. शेतीचे विविधीकरण

५. पशुपालन व मासेमारी

६. वित्तपुरवठा व विमा

७. शेतीविषयक संशोधन

# कृषी वित्त पुरवठयाचे स्त्रोत

- बिगर संस्थात्मक स्त्रोत
  - सावकार, जमिनदार, व्यापारी, नातेवाईक व अडत्ये
- संस्थात्मक स्त्रोत
  - सरकार, सहकारी संस्था, व्यापारी बँका, प्रादेशिक बँका, भूविकास बँका




# शेतमाल विक्रीव्यवस्था





शेतमाल विक्रीव्यवस्थेतील द

१. साठवणूक सोयींचा अभाव
२. मध्यस्थांची मोठी साखळी
३. प्रतीक्षाक्षमतेचा अभाव
४. वाहतूक सोयींचा अभाव
५. बाजारविषयक माहितीचा अभाव
६. प्रमाणीकरण व प्रतवारीचा अभाव
७.दलाल व व्यापारांकडून फसवणूक
८. विविध प्रकारचे आकार

उपाययेजना

१. नियंत्रित बाजाराची स्थापना
२. सहकारी विपणन संस्थांची स्थापना व विकास
३. गुदामांच्या सोयीत वाढ
४. कर्जपुरवठयाची उपलब्धता
५. प्रमाणित वजन-मापांचा वापर
६.बाजारविषयक माहितीचे प्रसारण
७. प्रतवारी व प्रमाणीकरण
८.वाहतुकीच्या सोयीत वाढ
९. किमतीचे स्थिरीकरण
१० . तपासणी, संशोधन आणि प्रशिक्षण

# विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ )

विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे आयात शुल्कात सवलत असलेले, इतर करांसाठी, परदेशी गुंतवणुकीसाठी आणि अन्य व्यवहारांसाठी शिथिल पध्दत असलेले मुद्दाम निश्चित केलेले क्षेत्र, ज्याला औद्योगिक , सेवा पुरवठा आणि व्यापारी व्यवहारांसाइी विदेशी मुलूख मानले जाते.

सेझची वैशिष्टये किंवा लक्षणे

१. परकीय प्रदेशाचा दर्जा

२. करसवलती

३. दर्जेदार पायाभूत सुविधा

४. नोकरशाहीचे अत्यल्प नियंत्रण

५. शिथिल कामगार कायदे





सेझ मुळे निर्माण झालेल्या समस्या

१. भूसंपादन

२. सूपीक जमिनीत घट

३. उद्योगांचे स्थलांतर

४. शासकीय महसुलात घट

५. असंतुलित वाढ

६. असमानता

७. सामाजिक असुरक्षितता

# शेतक-यांच्या आत्महत्या



**शेतक-यांच्या आत्महत्यांची कारणे :**

१. कर्जबाजारीपणा
२. कर्जाचा अनुत्पादक वापर
३. सावकारांकडून पिळवणूक
४. शेतमालाच्या किंमतीतील चढउतार
५. आदानांच्या किंमतीत वाढ
६. शेतीची अल्प उत्पादकता
७. नैसर्गिक आपत्ती
८. निकृष्ठ बियाणे
९. जमिनीविषयक वाद
१०. कुटूंबातील भांडणे
११. इतर कारणे

**शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजना**

१. दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाची अंमलबजावणी
२. रोजगार निर्मिती कार्यक्रम
३. शेतमालास उत्पादन खर्चावर आधारित भाव
४. पीक विमा योजना
५. माफक किंमतीत बी-बीयाणे, खते व किटकनाशके
६. जलसिंचन सुविधात वाढ
७. शेतीविषयक संशोधन शेतक-यांपर्यंत पोहचविणे
८. शेतीपुरक व्यवसायांचा विकास
९. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणे
१०. लोकसंख्या नियंत्रण
११. सहकारी चळवळीला योग्य दिशा देणे
१२. इतर उपाय

## प्रकरण चौथे

# भारताची लोकसंख्या



# भारताच्या लोकसंख्येची ठळक वैशिष्ठये

१. लोकसंख्येचा आकार मोठा
(२०११- १२१०१९३४२२)
२. उच्च जननदर आणि घटता मृत्यूदर
२०११- (जननदर- २०.९७, मृत्यूदर - ७.४८)
३.पुरषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण
२०११- (९४०)
४. साक्षरतेचे प्रमाण २०११-
(एकूण-७४.४, पुरुष- ८२.१४, स्त्रीयां- ६५.४६)
५. कामकरी लोकसंख्येत वाढ
६. ग्रामीण लोकसंख्येचे मोठे प्रमाण
७. प्राथमिक क्षेत्रातील लोकसंख्येचे मोठे प्रमाण
८. आर्युमर्यादा कमी
९. घनता जास्त



# भारतातील लोकसंख्यावाढ - लोकसंख्येचा आकार व वृध्दी

| जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटीमध्ये) | दशवार्षिक वृध्दी दर |
|---|---|---|
| १९११ | २५.२१ | ५.७ |
| १९२१ | २५.१३ | -०.४ |
| १९३१ | २७.९० | ११.० |
| १९४१ | ३१.८७ | १४.२ |
| १९५१ | ३६.११ | १३.३ |
| १९६१ | ४३.९२ | २१.६ |
| १९७१ | ५४.८२ | २४.८ |
| १९८१ | ६८.३३ | २४.७ |
| १९९१ | ८४.६३ | २३.८ |
| २००१ | १०२.८७ | २१.५ |
| २०११ | १२१.०२ | १८.७ |


# भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण

| जनगणना वर्ष | दर हजार पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण |
|---|---|
| १९५१ | ९४६ |
| १९६१ | ९४१ |
| १९७१ | ९३० |
| १९८१ | ९३४ |
| १९९१ | ९२७ |
| २००१ | ९३३ |
| २०११ | ९४० |

# वय संरचना

| वयोगट | २००१ | २०११ |
| --- | --- | --- |
| | | |
| ०-१४ | ३५.५ | २९.७ |
| १५-६५ | ५८.२ | ६४.९ |
| ६५-X | ६.३ | ५.४ |

# लोकसंख्येची घनता


500
400
300
200
100
0
117
142
173
216
273
324
373
1951
1961
1971
1981
1991
2001
2011

# भारतातील ग्रामीण व शहरी लोकसंख्या (१९५१-२०११)
## एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण

| वर्षे | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|
| १९५१ | ८२.७ | १७.३ |
| १९६१ | ८२.० | १८.० |
| १९७१ | ८०.१ | १९.९ |
| १९८१ | ७६.७ | २३.३ |
| १९९१ | ७४.३ | २५.७ |
| २००१ | ७२.२ | २७.८ |
| २०११ | ७०.० | ३०.० |

# लोकसंख्येची गुणवत्ता :

| वर्ष | आर्युमान | जन्मदर | मृत्यूदर | अर्भक मृत्यूदर |
|---|---|---|---|---|
| १९६१ | ४०.० | ३९.९(१९५१) | २७.४(१९५१) | १४६(१९५१) |
| २००१ | ६५.३ | २५.४ | ८.१ | -- |
| २०११ | ६६.८ | २०.९७ | ७.४८ | ४७.५७ |

भारतातील साक्षरतेचे प्रमाण (१९५१-२०११)

| जनगणना वर्ष | एकूण(%) | पुरुष (%) | स्त्रीया (%) |
|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७.१६ | ८.८६ |
| १९६१ | २८.३० | ४०.४० | १५.३५ |
| १९७१ | ३४.४५ | ४५.९६ | २१.९७ |
| १९८१ | ४३.५७ | ५६.३८ | २९.७६ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३९.२१ |
| २००१ | ६४.८४ | ७५.२६ | ५३.६७ |
| २०११ | ७४.४० | ८२.१४ | ६५.४६ |

# लोकसंख्या आणि आर्थिक विकास

१. लोकसंख्यावाढ आणि राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न

२. लोकसंख्या आणि रोजगार

३. लोकसंख्या आणि शहरीकरण

४. लोकसंख्या आणि शेती विकास

५. लोकसंख्येचा दर्जा

६. लोकसंख्या आणि दारिद्रय

७.लोकसंख्या आणि भांडवल उभारणी

८. लोकसंख्या आणि नैसर्गिक साधनांचा वापर

९. लोकसंख्या आणि अनुत्पादक उपभोक्ते

१०. लोकसंख्या वाढ आणि राहणीमानाचा दर्जा

# राष्ट्रीय लोकसंख्या धोरण- २०००

१. २०४५ पर्यंत लोकसंख्यावाढीत स्थिरता आणणे
२. बालमृत्यूचे प्रमाण दर हजारी ३० पर्यंत आणणे
३. ८० टक्के प्रसुती नियमित दवाखाने, वैद्यक संस्थामध्ये प्रशिक्षित कर्मचा-यांकडून करणे
४. दोन मुलांच्या छोटया कुटुंबास प्रोत्साहन देणे
५. सुरक्षित गर्भपाताच्या सुविधांत वाढ करणे
६. बालविवाह प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी
७. २१ वयानंतर विवाह करणा-या स्त्रीयांना प्रोत्साहन देणे
८. १४ वर्षापर्यंतच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे
९. लोकसंख्या विषयक राष्ट्रीय आयोगाची स्थापना करणे

## प्रकरण पाचवे

# उद्योग



त्र



# उद्योग

## औद्योगिकरणाचे महत्व

औद्योगिकरण ही एक प्रक्रिया असून, या प्रक्रियेत नैसर्गिक साधनसामग्री व इतर कच्चा यावर प्रक्रिया करुन उपभोगासाठी योग्य अशा वस्तूंचे उत्पादन केले जाते.

१.नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर

२. समतोल क्षेत्रीय विकास

३. भांडवलनिर्मितीच्या वेगात वाढ

४. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ

५. रोजगार संधीत वाढ

६. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी

७. निर्यातीत महत्वपुर्ण सहभाग

८. आर्थिक स्थैर्य

९. शेतीव्यवसायास आधार

१०. बाजाराचा विकास


११. सरकारी उत्पन्नात वाढ

१२. इतर



## १९९१ पासूनचे नविन औद्योगिक धोरण :

**औद्योगिक धोरण म्हणजे देशाच्या औद्योगिकरणाच्या सिध्दांत, उद्योगाचे व्यवस्थापन, औद्योगिकरणाची पध्दती तसेच वेग या बाबतीतचा सरकारचा दृष्टीकोन स्पष्ट करणारी अधिकृत घोषणा होय.**



## नविन औद्योगिक धोरणाची उद्दिष्टये :

१. अनावश्यक नियंणाच्या शृंखलातून भारतीय औद्योगिक व्यवस्था मुक्त करणे.
२. प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीवरील निर्बंध काढून टाकणे.
३. भारतीय अर्थव्यवस्थेची जागतिक अर्थव्यवस्थेशी सांगड घालणे.
४. सार्वजनिक क्षेत्राबाबत पूर्वग्रहरहित असे धोरण स्विकारणे
५. उत्पादन क्षेत्रात मक्तेदारी निर्माण होणार नाही याची काळजी घेणे.
६. मागासलेल्या प्रदेशात औद्योगिकरणास वेग देणे
७. देशी उत्पादनतंत्राचा विकास करणे
८. भारतीय उद्योगधंद्याची स्पर्धा क्षमता वाढवणे
९. रोजगाराच्या संधीत वाढ करणे.

# १९९१ च्या औद्योगिक धोरणाची वैशिष्टये :

१. औद्योगिक परवाना धोरणात बदल

२. सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती कमी

३. लघुउद्योगाबाबत महत्वपुर्ण तरतुदी

४. उद्योगांचे विकेंद्रीकरण

५. मक्तेदारी नियंत्रण कायदा

# १९९१ च्या औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन

## यश किंवा फायदे :

१. परमिट राज समाप्त करण्याची भारतीय उद्योगाची ब-याच दिवसांची मागणी पूर्ण झाली.

२. कंपन्यांच्या विकासाला चालना मिळाली.

३. नोकरशाही व राजकारण्यांकडून औद्योगिक प्रगतीमध्ये केले जाणारे अडथळे कमी झाले.

४. कंपन्यांचे एकत्रीकरण,ताब्यात घेणे, विलिनीकरण याबाबत उद्योगांना स्वातंत्र्य प्राप्त झाले.

५. कंपन्यांना विविधीकरण, विस्तार आणि अधुनिकीकरण यासाठी भांडवल उभारणी करणे सुलभ झाले.

६. सार्वजनिक क्षेत्रातील खासगी सहभागामुळे स्पर्धा आणि व्यवसायभिमुखता वाढवण्यास मदत झाली.

## दोष किंवा अपयश

१. विदेशी भांडवलाचा वाढता धोका

२. मक्तेदारी वाढण्याचा धोका

३. प्रादेशिक विषमता

४. लघुउद्योगांना मारक

५. बेकारीत वाढ होण्याची शक्यता

६. सार्वजनिक क्षेत्रासंबंधीची टीका

७. अस्थिरता

८. कमी महत्वाच्या वस्तूंचे उत्पादन

९. अवास्तव अवलंबित्वाचा धोका




# माहिती तंत्रज्ञान

प्राथमिक, दुय्यम आणि तृतीयक उद्योगाबरोबरच आज उद्योगात माहितीशी संबंधीत उद्योगांची भर पडलेली आहे. माहिती तंत्रज्ञान उद्योगाची व्याप्ती अतिशय मोठी असून यात कारखानदारी, शिक्षण, करमणूक, संरक्षण, व्यापार, संदेशवहन अशा विविध बाबींशी निगडीत उद्योगांचा समावेश होतो.

माहिती तंत्रज्ञान उद्योगात माहिती निर्मिती, माहिती प्रक्रिया, माहिती पारेषित करणे, माहिती दुरवर पोहचविणे, माहिती साठविणे, माहितीची नोंद करणे आणि माहितीची पुर्नसाठवणूक करणे या व्यवहारांचा समावेश होतो.

# माहिती तंत्रज्ञान उद्योग

## एकूण भारतीय IT बाजार (मिळणारा महसूल)

| वर्ष | रू. कोटी | जीडीपी च्या टक्के |
|---|---|---|
| १९९४-९५ | ६३४५ | ०.६३ |
| १९९८-९९ | २५३०७ | १.४५ |
| २०००-०१ | ५६५९२ | २.६६ |
| २००२-०३ | ७९३३७ | ३.१५ |

## बहुराष्ट्रीय कंपन्या : अर्थ व वैशिष्टये

बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे अशी कंपनी की जी अनेक देशात कार्यरत असते आणि तिला आपल्या देशाबाहेर उत्पादन व सेवा सुविधा उपलब्ध असतात.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या मते,

बहुराष्ट्रीय कंपनीच्या व्यवस्थापनाचे मुख्यालय एका देशात मात्र कंपनी इतर अनेक देशात कार्यरत असते.

### बहुराष्ट्रीय कंपन्यांची लक्षणे किंवा वैशिष्टये :

१. कार्यक्षेत्र मोठे
२. उत्पादन व गुंतवणूकीचे आंतरराष्ट्रीयीकरण
३. विविध व्यवहारात सहभाग
४. विपणनाच्या बाबतीत वर्चस्व
५. आर्थिक स्थिती भक्कम
६. अद्ययावत तंत्रज्ञान
७. नाविन्यपूर्ण उत्पादने

## प्रकरण सहावे

# कामगार / श्रम



डॉ. मार्शल यांच्या मते,

मोबदला मिळवण्याच्या हेतूने व्यक्तीने केलेले शारीरिक अथवा बौध्दिक प्रयत्न म्हणजे श्रम होय.

# भारतातील कामगारांची रचना

भारतातील संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगार/ श्रमिक (१९९९-२०००) (आकडेवारी दशलक्ष)

| क्षेत्र | संख्या (दशलक्ष) | एकूण टक्के |
|---|---|---|
| १. संघटीत क्षेत्र | २८ | ७.१ |
| २. असंघटीत क्षेत्र | ३६९ | ९२.९ |
| अ. शेती | २३७ | ५९.७ |
| ब. बांधकाम | १७ | ४.३ |
| क. कारखानदारी | ४१ | १०.३ |
| ड. व्यापार, वाहतूक व दळणवळण | ३७ | ९.३ |
| इ. वैयक्तिक आणि सामजिक सेवा | ३७ | ९.३ |
| एकूण १ + २ | ३९७ | १००.० |

## औद्योगिक कामगारांची लक्षणे किंवा वैशिष्टये :

१. एकतेचा अभाव
२. स्थलांतरीत
३. निरक्षरतेचे मोठे प्रमाण
४. काम सोडण्याची वृत्ती
५. अनुपस्थिती किंवा गैरहजेरी
६. शिस्त नसणे





सद्य:स्थितीतील औद्योगिक कामगारांची वैशिष्टये आणि पूर्वीच्या तुलनेत झालेले बदल राष्ट्रीय श्रम आयोगाने पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

१. सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा
२. सामाजिक सुरक्षितता आणि कल्याणकारी लाभ
३. नोकरीची सुरक्षितता
४. पेसारूप वेतन
५. उपभोग रचना
६. राहत्या जागेची स्थिती
७. कामगारांची सामाजिक रचना
८. कामगारांच्या लिंगरचनेत बदल
९. बालकामागारांमध्ये घट

# औद्योगिक कलह : कारणे आणि उपाययोजना

ओद्योगिक विवाद किंवा कलह म्हणजे कोणत्याही व्यक्तीचा रोजगार किंवा बेकारी तिच्या रोजगाराच्या अटी किंवा मजुरीच्या शर्ती यांच्याशी संबंधित असेल असा नियुक्तक, नियुक्त यामधील किंवा नियुक्तक आणि कामगार यामधील किंवा कामगार - कामगारांमधील तंटा किंवा मतभेद होय.

## भारतातील औद्योगिक कलहाची कारणे :

१. वेतनवाढ
२. बोनसची मागणी
३. कामाच्या परिस्थितीत सुधारणा
४. नोकरकपात
५. कामगार संघनेस मान्यता
६. कामाचे तास, रजा व सुटया
७. कामगार संघटनेच्या नेत्याचा अपमान
८. राजकारण्यांचा स्वार्थ
९. किंमतपातळीत वाढ
१०. उद्योगाचे अधुनिकीकरण
११. व्यवस्थापनातील सहभागाची मागणी
१२. इतर कारणे

## औद्योगिक कलह सोडविण्यासाठी उपाययोजना :

१. कारखाना समित्या
२. सलोखा अधिकारी
३. सलोखा मंडळ
४. चौकशी न्यायालय
५. कामगार न्यायालये
६. औद्योगिक न्यायसभा
७. राष्ट्रीय औद्योगिक न्यायालये
८. संयुक्त व्यवस्थापन मंडळे
९. अनुशासन संहिता
१०. राष्ट्रीय लवाद संवर्धन मंडळ

# भारतातील सामाजिक सुरक्षिततेच्या उपाययोजना

**सामाजिक सुरक्षितता:**

सामाजिक सुरक्षितता म्हणजे समाजाने योग्य संघटनेच्या माध्यमाने आपल्या संभासदांना विविध धोक्याच्या प्रसंगी मदत करणे होय.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या मते,

समाजाने आपल्या सदस्यांना योग्य यंत्रणेव्दारे आपत्ती काळात केलेली मदत म्हणजे सामाजिक सुरक्षितता होय.

**सामाजिक सुरक्षिततेच्या पध्दती :**

अ. सामाजिक सहाय्य

ब. सामाजिक विमा

क. सार्वजनिक सेवा

**-भारतातील सामाजिक सुरक्षिततेच्या उपाययोजना**

१. नुकसान भरपाई

२. कामगार राज्य विमा कायदा

अ. आजारपणातील लाभ

ब. वैद्यकीय लाभ

क. बाळंतपणातील लाभ

ड. अपंगत्व लाभ

इ. कुटुंब लाभ

३. भविष्य निर्वाह निधी

४. कोळसा खाण -भविष्य निर्वाह निधी आणि बोनस योजना कायदा

५. सानुग्रह अनुदान योजना

६. कुटुंब निवृत्ती वेतन

## प्रकरण सातवे

# भारतातील नियोजन

**प्रा. डिकिन्सन यांच्या मते,**

आर्थिक नियोजन म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण पाहणीवर आधारीत कोणते व किती प्रमाणात उत्पादन करायचे कसे, केंव्हा व कोठे उत्पादन करावे, केलेल्या उत्पादनाचे वाटप कशा प्रकारे करावयाचे यासारखे निर्णय निश्चित अशा सत्तेने जाणीवपूर्वक घेणे होय.

**प्रा. डाल्टन यांच्या मते,**

व्यापक अर्थाने आर्थिक नियोजन म्हणजे पूर्वनिश्चित उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आर्थिक क्रियांना देशातील साधनसामग्रीवर ताबा असणा-या व्यक्तींनी जाणीवपूर्वक दिशा देणे होय.

**प्रा. हायेक यांच्या मते**

नियोजन म्हणजे केंद्रिय सत्ताधिका-याने उत्पादक व्यवहारांना दिशा देणे होय.

**भारतीय नियोजन मंडळाच्या मते,**

देशातील साधनसामग्री संघटित करुन तिचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेऊन सामाजिक उद्दिष्टये साध्य करण्यासाठी आखण्यात आलेला मार्ग किंवा अवलंब केलेली पध्दती म्हणजे आर्थिक नियोजन होय.

# आर्थिक नियोजनाची आवश्यकता :

१. आर्थिक विकास साध्य करणे
२. दारिद्र्य दूर करणे
३. अनियोजित अर्थव्यवस्थेतील दोष दूर करणे.
४. किंमत स्थैर्य प्रस्थापित करणे
५. दुर्मिळ नैसर्गिक साधनसामुग्रीचा योग्य वापर
६. पायाभूत सुविधांचा विकास
७. विचारपूर्वक व दूरदृष्टीने निर्णय घेणे
८. उत्पन्नाच्या वाटपातील विषमता दूर करणे
९. समाजातील जास्तीत जास्त लोकांचे कल्याण साधणे.

# आर्थिक नियोजनाची उद्दिष्टये :

१. जलद आर्थिक वृध्दी
२. रोजगारात वाढ
३. अधुनिकीकरण
४. उत्पन्नातील विषमता कमी करणे
५. समाजवादी समाजरचना निर्माण करणे
६. स्वावलंबन

# दहाव्या पंचवार्षिक योजनेचे यशापयश

१ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००७

## दहाव्या योजनेच यश :

१. उच्च वृध्दी दर -  स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढीचा दर

| | |
|---|---|
| १९९७-२००२ | ५.५ |
| २००२-२००७ | ७.२ |

२. राष्ट्रीय उत्पादनात वाढ-

घटकखर्चानुसार स्थूल देशांतर्गत उत्पादन (हजार कोटी रुपये) चालू किंमतीला

| | |
|---|---|
| २००२-०३ | २२६५.३ |
| २००४-०५ | २८५५.९ |
| २००६-०७ | ३७४३.५ |

३. दरडोई राष्ट्रीय उत्पन्नात वाढ - दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पादन स्थिर किंमतीला रुपये

| | |
|---|---|
| २००२-०३ | १७०७५ |
| २००४-०५ | १९२९७ |
| २००६-०७ | २०७३४ |

४. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनात वाढ

| वर्ष | औद्योगिक उत्पादन निर्देशांक | तयार पोलाद (दशलक्ष टन) | सिमेंट (दशलक्ष टन) | कोळसा (दशलक्ष टन) |
|---|---|---|---|---|
| २००२-०३ | १७६.६ | ३३.४ | ११६.३ | ३६७.२ |
| २००४-०५ | २०४.८ | ३९.३ | १३३.६ | ४१२.९ |
| २००६-०७ | २४७.१ | - | - | - |

५. स्थूल देशांतर्गत बचतीतील बदल

| वर्ष | स्थूल देशांतर्गत बचत दर |
|---|---|
| २००२-०३ | २६.४ |
| २००३-०४ | २९.४ |
| २००४-०५ | ३१.१ |
| २००५-०६ | ३२.४ |
| २००६-०७ | -- |

६. स्थूल देशांतर्गत गुंतवणूक दरात वाढ

| वर्ष | स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी शेकडा प्रमाण |
|---|---|
| २००२-०३ | २५.२ |
| २००३-०४ | २८.० |
| २००४-०५ | ३१.५ |
| २००५-०६ | ३३.८ |
| २००६-०७ | -- |

७. परकीय चलन निधित वाढ : परकीय चलन निधि (दशलक्ष अमेरिकन डॉलर)

| वर्ष | परकीय चलन |
|---|---|
| २००२-०३ | ७६१०० |
| २००३-०४ | ११२९५१ |
| २००४-०५ | १४१५१४ |
| २००५-०६ | १५१६२२ |
| २००६-०७ | १९९१७९ |

८. राष्ट्रीय उत्पन्नातील प्राथमिक क्षेत्राच्या वाटयात घट :

वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादनाची रचना (१९९९-२००० च्या किंमतीला) (शेकडा प्रम

| क्षेत्र | वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| १. शेती व संयुक्त | २१.५ | २१.७ | २०.२ | १९.७ | १८.५ |
| २. उद्योग | २५.७ | २५.६ | २६.१ | २६.२ | २६.४ |
| ३. सेवा | ५२.८ | ५२.७ | २३.७ | २४.१ | ५५.१ |

## ९. केंद्र सरकारची राजकोषीय तूट (स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी शेकडा प्रमाण)

| वर्ष | राजकोषीय तूट |
|---|---|
| २००२-०३ | ५.९ |
| २००३-०४ | ४.५ |
| २००४-०५ | ४.० |
| २००५-०६ | ४.१ |
| २००६-०७ | ३.८ |

# दहाव्या योजनेचे अपयश :

१. स्थूल देशांतर्गत उत्पादनात अपेक्षित वाढ नाही:

स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे लक्ष्य ८ टक्के - प्रत्यक्षात ७.२ टक्केच साध्य

२. शेती क्षेत्राची असमाधानकारक प्रगती

शेती क्षेत्राची वृध्दीचे लक्ष्य ४ टक्के - प्रत्यक्षात १.७ टक्के

३. दारिद्र्याच्या प्रमाणात अपेक्षित घट नाही:

दहाव्या योजनेतील लक्ष्य १९.२ टक्क्यांपर्यंत दारिद्र्य कमी करणे-
प्रत्यक्षात २००४-०५ पर्यंत प्रमाण २७.८ टक्के होते.

४. बेकारीच्या समस्येची तीव्रता कमी करण्यात अपयश

बेकारीचे प्रमाण ७.११ टक्क्यांवरुन ५.११ टक्के करण्याचे लक्ष्य परंतु योजनेच्या
कालावधीत बेकारीच्या प्रमाणात आणखी वाढ- २००४-०५ पर्यंत ८.३ टक्के वाढ

५. बालमृत्यूदर कमी करण्यात अपयश

२००७ पर्यंत बालमृत्यूदर ४५ एवढा करण्याचे लक्ष होते परंतु २००५-०६ च्या आर्थि
पाहणीनुसार हा बालमृत्यूदर प्रति हजारी ५८ एवढा होता.

६. किंमतवाढ रोखण्यात अपयश :

चलनवाढीचा दर (शेकडा प्रमाण)

| वर्ष | घाऊक किंमत निर्देशांक |
|---|---|
| २००२-०३ | ३.४ |
| २००३-०४ | ५.५ |
| २००४-०५ | ६.५ |
| २००५-०६ | ४.४ |
| २००६-०७ | ५.० |

७. बाळंतपणातील मृत्यू दरातील घटीचे लक्ष्य पूर्ण करण्यात अपयश

८. साक्षरता वाढीचे लक्ष्य पूर्ण करण्यात अपयश-

लक्ष्य : ७५ टक्क्यापर्यंत होते प्रत्यक्षात २००५ पर्यंत ६१ टक्कयापर्यंतच वाढ

९. सर्व खेडयांना पिण्याचे पाणी नाही

१०. सर्व मुलांना प्राथमिक शिक्षणात सहभागी करुन घेण्यात अपयश

# अकरावी पंचवार्षिक योजना : (२००७-२०१२)

## अकराव्या पंचवार्षिक योजनेची सामाजिक-आर्थिक लक्ष्ये :

| अ. उत्पन्न व दारिद्र्य | ब. शिक्षण | क. आरोग्य | ड. स्त्रिया आणि मुले | ई. पायाभूत सुविधाः | फ. पर्यावरण |
|---|---|---|---|---|---|
| १. शेतीपासून स्थूल देशांतर्गत उत्पादनात प्रती वर्षी सरासरी ४ टक्के दराने वाढ करणे. | १. प्राथमिक शाळेतील मुलांच्या गळतीचे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत कमी करणे. | १. प्रति हजार जन्मणा-या बालकांच्या मागे बालमृत्यूदर २८ टक्क्यांपर्यंत कमी करणे. | १. ० ते ६ वयोगटातील स्त्री-पुरुष प्रमाणात २०११-१२ पर्यंत ९३५ आणि २०१६-१७ पर्यंत ९५० एवढी वाढ करणे. | १. सर्व गावे आणि दारिद्र्य रेषेखालिल कुटुंबाना २००९ पर्यंत वीज कनेक्शन देणे तसेच योजनेच्या अखेरपर्यंत २४ तास वीजपुरवठा करणे. | १. जंगल आणि वृक्षाखालिल क्षेत्रात ५ टक्के बिंदूने वाढ करणे. |
| २. ७० दशलक्ष नवीन कामाच्या संधी निर्माण करणे. | २. ७ आणि ७ वर्षावरील व्यक्तींच्या साक्षरतेचे प्रमाण ८५ टक्क्यांपर्यंत वाढविणे. | २. एकूण जननक्षमता दर २.१ टक्क्यांपर्यंत कमी करणे. | २. सरकारच्या सर्व योजनांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ३३ टक्के लाभार्थी स्त्रिया आणि मुली असतील याची खात्री करणे. | २. नोव्हेंबर २००७ पर्यंत प्रत्येक खेडे टेलीफोनने जोडणे आणि २०१२ पर्यंत सर्व खेडयांना ब्रॉड बँड जोडणी देणे. | २. सर्व प्रमुख शहरात २०११-१२ पर्यंत हवेची गुणवत्ता जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार साध्य करणे. |
| ३. सुशिक्षित बेकारी ५ टक्क्यांपेक्षा खाली आणणे | ३. साक्षरतेच्या बाबतीतील स्त्री-पुरुषातील फरक १० टक्के बिंदूंने कमी करणे. | ३. २००९ पर्यंत सर्वांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करणे | ३. सर्व मुले कोणत्याही कामाच्या सक्तीशिवाय आपले सुरक्षित बालपण उपभोगतील याची खात्री करणे. | ३. १००० आणि त्यापेक्षा जास्त लोकसंख्येच्या वसतिस्थानांना सर्व हवामानात टिकू शकणारे रस्ते उपलब्ध करणे. | ३. २०१६-१७ पर्यंत उर्जा कार्यक्षमता २० टक्के बिंदूने वाढविणे. |
| ४. असंघटीत कामगाराच्या वास्तव वेतनात २० टक्के वाढ करणे. | ४. उच्च शिक्षण घेणा-यांचे प्रमाण ११ व्या योजनेच्या अखेरपर्यंत १५ टक्क्यांपर्यंत वाढविणे. | ४. ० ते ३ वर्षे वयोगटातील मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण निम्म्याने कमी करणे. | | | |
| | | ५. स्त्रिया आणि मुली यांच्यातील रक्तक्षय रोगाचे | | | |

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था



# महाराष्ट्राची ठळक वैशिष्ठये :

## अ. महाराष्ट्रातील साधनसामग्री :

### १. जमीन साधनसामग्री :

*जंगलाखालील क्षेत्र : १९९८-९९ मध्ये जंगलाखालील क्षेत्राचे एकूण जमिनीच्या क्षेत्राशी प्रमाण १७.४ टक्के होते

*ओसाड व मशागतीस अयोग्य अशा जमिनीच्या क्षेत्रात १९६०-६१ ते १९९८-९९ या काळात ५.३ टक्क्यांवरून ५.९ टक्क्यांपर्यंत वाढ झाली.

*लागवडीखाली नसलेल्या जमिनीत मशागत योग्य जमीन , कायमची कुरणे व इतर चराऊ राने याखालील जमिनीचा समावेश होतो १९६०-६१मध्ये मशागत योग्य पडित जमिन क्षेत्र -०.९२ दशलक्ष हेक्टर होते -हे प्रमाण १९९८- मध्ये ०.८८ दशलक्ष हेक्टर झाले.

*१९६०-६१ मध्ये चालू पड क्षेत्र १.१८ दशलक्ष हेक्टर हे प्रमाण १९९८-९९ मध्ये १.१३ दशलक्ष हेक्टर झाले हो

*१९६०-६१ मध्ये पेरलेले क्षेत्र १७.७४ दशलक्ष हेक्टर एवढे होते हे प्रमाण १९९८-९९ मध्ये १७.३२ दशलक्ष हे

### २. जल साधनसामग्री :

| विभाग | प्रकल्प जलाशयाची संख्या |
|---|---|
| कोकण | १०३ |
| नाशिक | ३२० |
| पुणे | ४८८ |
| औरंगाबाद | ४७१ |
| अमरावती | ३१९ |
| नागपूर | ३५८ |
| इतर | १४ |
| एकुण | २०७३ |

## ३. जंगलसाधनसामग्री

१९९९-०० नुसार जंगलाखालील क्षेत्राचे प्रमाण १७.४५ टक्के आहे.
महाराष्ट्रातील जंगलाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये, अर्धसदाहरित अरण्ये, पानझडी वृक्षांची अरण्ये,काटेरी खुरटया वनस्पतीची अरण्ये महाराष्ट्रातील जंगले असलेले प्रदेश व त्यातील जिल्हे पुढील प्रमाणे अ

विदर्भ- गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, बुलढाणा, नागपूर या जिल्हयात जंगले आहेत.

मेळघाट व सातपुडा प्रदेश- अमरावती व धुळे भागात ही जंगले आहेत.

सहयाद्री प्रदेश- नाशिक, पुणे, सातारा व कोल्हापूर जिल्हयात ही जंगले आहेत.

किना-यावरील प्रदेशः ठाणे, रायगड, रत्नागिरी, यांचा समावेश होतो.

याशिवाय राखीव जंगले, संरक्षित जंगले, अवर्गीकृत जंगले, झुडपी जंगले  महाराष्ट्रात आहेत.

## ब. महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा

प्रा. अल्बर्ट हर्षमन यांच्या मते,

प्राथमिक, दुय्यम, व तृतीय क्षेत्रातील उत्पादक कार्ये ज्या शिवाय पार पाडली जाणार नाहीत अशा मूलभूत सेवा म्हणजेच पायाभूत सुविधा होय.

# महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचे महत्व

१. भांडवल साठयात वाढ
२. नवन्मेषासाठी योग्य परिस्थिती
३. उत्पादन वाढीला गती
४. गुंतवणूक वाढ
५. उत्पादकता वाढ
६. बाजाराचा विस्तार
७. उत्पादक कार्याला प्रेरणा
८. शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास

## a. जलसिंचन

### i. पाटबंधारे प्रकल्प

### राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांची संख्या

| बाब | मोठे | मध्यम (राज्य क्षेत्र) | लघु (स्थानिक क्षेत्र) | लघु | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २००७ पर्यंत पूर्ण झालेल्या प्रकल्पांची संख्या | ३२ | १८३ | २४११ | ५२३ ८० | -- |
| २००७ पर्यंत बांधकामाधीन प्रकल्पांची संख्या | ३३ | ७३ | ३५८ | ७६१ ९ | -- |

## ii. महाराष्ट्रातील सिंचन विकास महामंडळे -

| महामंडळाचे नाव | स्थापना | सिंचन क्षमतेचे लक्ष्य |
|---|---|---|
| महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ | जाने. ९६ | १०.८५ |
| विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ | मार्च ९७ | ११.०० |
| तापी पाटबंधारे विकास महामंडळ | मार्च ९७ | ५.२३ |
| कोकण पाटबंधारे विकास महामंडळ | डिसे.९७ | ०.८० |
| गोदावरी - मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ | ऑगष्ट ९८ | ५.६१ |

## iii. पाटबंधारे क्षेत्रातील सुधारणा-

- २ ० ० ३ मध्ये राज्य जलनिती ठरविली

-महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २ ० ० ३

-महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-यांकडमन व्यवस्थापन अधिनियम, २ ० ० ०४

-पाणी वापर संस्था

-एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम

## b. वाहतूक किंवा परिवहन :

वाहतूक किंवा परिवहन क्षेत्रात रस्ते, मोटार वाहने , रेल्वे वाहतूक, नागरी विमान वाहतूक, इ. चा समावेश होतो.

i. रस्ते: - १९६१ मध्ये राज्यात ३७९५७ कि.मी. लांबीचे रस्ते होते
२००७ अखेर राज्यात २३३६६४ कि.मी. लांबीचे रस्ते होते.

मोटार वाहने:

१ जानेवारी २००८ रोजी महाराष्ट्रात मोटार वाहनांची संख्या १३०.३ लाख होती आणि प्रति लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या १२०९२ एवढी होती.

### ii. रेल्वे वाहतूक

महाराष्ट्रातील औरंगाबाद,पुणे,नागपूर,कोल्हापूर,नांदेड, जळगाव, वर्धा, अमरावती आणि अकोला ही जिल्हयाची ठिकाणी मुंबईशी जोडलेली आहे. भारतातील प्रमुख व्यापारी केंद्रे आणि मोठी शहरे मुंबईशी लोहमार्गाने जोडली गेली आहेत. ३१ मार्च २००७ अखेर महाराष्ट्रात ५९०२ कि.मी. रेल्वे मार्ग होता

### iii. जलवाहतूक

महाराष्ट्रास ७२० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. राज्याच्या किनारप+ीवर मुंबई पोर्ट, आणि जवाहर नेहरू पोर्ट ट्रस्ट ही दोन मोठी बंदरे आहेत. २००३-०४ मध्ये या दोन्ही पोर्टनी ५८८ लाख टन मालाची वाहतूक केली होती तसेच राज्यात असलेल्या ४८ छोटया बंदरानी मिळून १०८.६ लाख प्रवाशांची वाहतूक केली होती.

## iv. नागरी विमान वाहतूक:

महाराष्ट्रातील विमानतळावरून झालेली प्रवासी तसेच मालवाहतूक (२००६-०७)

| विमान | विमान उड्डाने | विमानाने गेलेले प्रवासी(संख्या) | विमानाने आलेले प्रवासी (संख्या) | विमानाने पाठविलेला माल (टन) | विमानाने आलेला माल(टन) |
|---|---|---|---|---|---|
| देशांतर्गत | १७७०३४ | ८६१३१०० | ८५९०३२७ | ८४८३२ | ८४७१० |
| आंतरराष्ट्रीय | ५४४५७ | ३६१८१५० | ३२७२१४६ | १८६९७७ | १४१०५३ |

## C. वीज

महाराष्ट्रातील वीजनिर्मिती (दशलक्ष किलो वॅट तास)

| प्रकार | १९६०-६१ | २००३-०४ |
|---|---|---|
| औष्णिक | १८३५ | ५४०७१ |
| तेलजन्य | ६८ | -- |
| जलजन्य | १३६५ | ५४२५ |
| नैसर्गिक वायूजन्य | -- | ५४३२ |
| अणुशक्तीजन्य | -- | ११३१ |
| इतर | -- | ९३२ |

# महाराष्ट्रातील पीक रचना

१. अन्नधान्याखालील क्षेत्रात चढउतार

| वर्ष | एकूण पीक क्षेत्राशी प्रमाण |
|---|---|
| १९६०-६१ | ६८.८२ |
| १९७०-७१ | ६८.७७ |
| १९८०-८१ | ६९.७० |
| २०००-०१ | ५७.१९ |

| वर्ष | एकूण पीक क्षेत्राशी प्रमाण | |
|---|---|---|
| | तृणधान्याखालील क्षेत्रात घट | कडधान्याखालील क्षेत्रात वाढ |
| १९६०-६१ | ५६.३४ | १२.४८ |
| २०००-०१ | ४२.०१ | १५.१४ |

## २. बिगर अन्नधान्य क्षेत्रात चढउतार

| वर्ष | एकूण पीक क्षेत्राशी प्रमाण |
|---|---|
| १९६०-६१ | ३१.१८ |
| २०००-०१ | ४२.८१ |

| वर्ष | एकूण पीक क्षेत्राशी प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|
| | तेलबियाखालिल क्षेत्रात चढउतार | उसाखालिल क्षेत्रात सातत्याने वाढ | कापसाखालील क्षेत्रात वाढ | फळे व भाजीपाल्याखालील क्षेत्रात सातत्यपूर्ण वाढ |
| १९६०-६१ | ९.९२ | ०.८२ | १३.२८ | ०.८ |
| २०००-०१ | ११.२६ | २.९७ | १३.८७ | २.८ |

## शेतीची उत्पादकता :

$$\text{प्रतिहेक्टरी उत्पादकता} = \frac{\text{शेतीतील उत्पादन}}{\text{क्षेत्रफळ}}$$

## प्रतिश्रमिक उत्पादकता

$$\text{प्रतिश्रमिक उत्पादकता} = \frac{\text{शेतीतील एकूण उत्पादन}}{\text{श्रमिकांची संख्या}}$$

## महत्वांच्या पिकांचे प्रतिहेक्टरी उत्पादन (२००५-०६)
## (प्रती हेक्टर किलोग्रॅम)

| राज्य | तांदूळ | गहू | ज्वारी | बाजरी | कापूस |
|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | २९३९ | ८१८ | १३२४ | १०१२ | ३४७ |
| गुजरात | १९४९ | २७०० | ११३८ | ११६९ | ६०४ |
| पंजाब | ३८५८ | ४१७९ | -- | १००० | ७३१ |
| बिहार | १०७५ | १६१७ | १०२४ | १०७० | -- |
| महाराष्ट्र | १७६८ | १३९३ | ७८३ | ६५० | १८७ |
| भारत | २१०२ | २६१९ | ८८० | ८०२ | ३६२ |

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

## १. महाराष्ट्रातील सहकारी संस्थाची वाढ

| सहकारी संस्थेचा प्रकार | १९६१ | २००७ |
|---|---|---|
| १. शिखर व मध्यवर्ती पतसंस्था | | |
| अ. कृषी | ३७ | ३३ |
| ब. बिगर कृषी | २ | २ |
| २. प्राथमिक कृषी पतसंस्था | २१४०० | २१३३८ |
| ३. बिगर कृषी पतसंस्था | १६३० | २६६५९ |
| ४. पणन संस्था | ३४४ | १४८५ |
| ५. उत्पादक उपक्रम(सहकारी साखर कारखाने) | ४३०६ | ४४४०१ |
| ६. समाजसेवा व इतर सहकारी संस्था | ३८४६ | १०६९५२ |
| एकूण | ३१५६५ | २००७४० |

२. सभासदांच्या संख्येत वाढ

| वर्ष | सभासदांची संख्या |
|---|---|
| १९६०-६१ | ४१ लाख |
| मार्च २००७ | ४६९ लाख |

३. खेळत्या भांडवलात वाढ

| वर्ष | खेळते भांडवल |
|---|---|
| १९६०-६१ | २९१ कोटी |
| मार्च २००७ | २०९८२३ |

४. विविध प्रकारच्या सहकारी संस्था

| प्रकार | २००६-०७ |
|---|---|
| जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | ३१ |
| प्राथमिक कृषी सहकारी संस्था | २१२३८ |
| नागरी सहकारी बँका-६०५ | शाखा-१६०० पेक्षा जास्त |
| सहकारी साखर कारखाने | २०२ |
| पणन सहकारी संस्था | ११४४ |

## साखर उद्योगांच्या समस्या :

१. कच्च्या मालाची कमतरता
२. योग्य नियोजन व व्यवस्थापनाचा अभाव
३. राजकीय हस्तक्षेप
४. योग्य विपणन व व्यवस्थापनाचा अभाव
५. अकुशल कर्मचारी
६. वशिल्याने होणारी कर्मचारी भरती
७. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव
८. उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर
९. उत्पादन खर्च जास्त
१०. साखर निर्यातीच्या बाबतीत समस्या